# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

०१ जुन, २०२०



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)


# घरगुती वादावरून सख्या भावाचा खुन करणाऱ्यास जन्मठेपेची शिक्षा

पोलीस स्टेशन मुल अंतर्गत मौजा डोंगरगाव येथे घरगुती वादावरून खुन करणाऱ्या आरोपीस ३१/०६/२०२० रोजी **कु.स.ज. अंसारी जिल्हा न्यायाधीश क्र. १ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश चंद्रपुर** यांनी शिक्षा ठोठावली आहे.

पोलीस स्टेशन मुल अंतर्गत मौजा डोंगरगाव येथील रहिवासी आरोपी आणि मृतक हे दोघेही नात्याने भाउ असुन दिनांक ३१/०४/२०१७ रोजी आरोपी नामे सदानंद मारोती गुरनुले वय ३५ रा. डोंगरगाव ता. मुल आणि मृतक हे आपले घरी बोलचाल करीत होते. दरम्यान घरगुती जुन्या कारणावर वाद निर्माण झाला आणि आरोपीने आपल्या सख्या भाउस धारदार चाकुने वार करून त्याचा जिव घेतला. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भद्रावती येथे अप.क्र. २७५/२०१७ कलम ३०२ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा तपासात घेतल्यानंतर तत्कालीन **उपविभागीय पोलीस अधिकारी मुल श्री. विशाल हिरे** यांचे मार्गदर्शनात आरोपीतांना निष्पन्न करून आरोपीविरूध्द सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक ३०/०५/२०२० रोजी **आरोपी नामे सदानंद मारोती गुरनुले वय ३५ रा. डोंगरगाव ता. मुल यास कलम ३०२ भादंवि अन्वये जन्मठेपेची शिक्षा आणि ५००/—रू दंड, दंड न भरल्यास ६ महिने कारावासाची शिक्षा कु.स.ज. अंसारी जिल्हा न्यायाधीश क्र. १ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. एस आर देगावार, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** आणि कोर्ट पैरवी म्हणुन पोहवा. पुष्पगंध बावणे, पोलीस स्टेशन मुल यांनी काम पाहिले.

———————————————————————————————————

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
✍: 7276494810 (PRO)

# चिमुकलीचा प्राण वाचविणाऱ्या पोलीसाचे पोलीस अधीक्षकांनी केले कौतुक

दिनांक २९/०५/२०२० रोजी पोलीस स्टेशन भिसी हद्दीतील शंकरपुर येथील रहिवासी प्रभाकर बारेकर हे आपल्या अडीच वर्षाच्या मुलीसोबत रात्रोला विहिरीच्या काठाजवळ बसुन खेळत होते. खेळताखेळता अचानकपणे त्या चिमुकलीचा तोल गेल्याने ती विहिरीत पडली हे पाहताच वडीलांनीसुध्दा तिला वाचविण्यासाठी विहीरीत उडी टाकली. परंतु दोघांनाही पोहता येत नसल्याने ते विहिरीत बुडत होते. त्यांनी आरडाओरडा केल्योने त्याठिकाणी लोकांची गर्दी जमली. परंतु कोणालाही पोहता येत नसल्याने त्यांना वाचविण्यासाठी कोणाचीही हिम्मत होत नव्हती.

गस्त करणारे पोलीसांचे पेट्रोलींग वाहन गावात पोहचले. गावात जमलेली गर्दी पाहुन पोलीसांनी विचारपुस केली. माहिती लक्षात येताच पेट्रोलींग वाहनातील सहायक पोलीस उपनिरिक्षक श्री. विनोद जांभळे आणि त्यांचे सहकारी कर्मचारी पोलीस शिपाई परमेश्वर नागरगोजे यांनी विहीरीजवळ धाव घेतली. आणि परमेश्वर नागरगोजे यांनी विहीरीत पडलेल्या त्या चिमुकली आणि त्यांचे वडील मदतीचा हाक मारणारी किंचाळी ऐकली. ऐवढा सगळा प्रकार पाहुन परमेश्वर यांनी कोणत्याही क्षणाचा विचार आणि आपल्या जिवाचीही पर्वा न करता सरळ त्या खोल विहीरीत उडी टाकली आणि त्या चिमुकली आणि तिच्या वडिलाला सुखरूप बाहेर काढले आणि तात्काळ उपचाराकरीता सामान्य रूग्णालयात दाखल केले.

परमेश्वर नागरगोजे यांचे सर्व स्तरातुन कौतुक होत असतांनाच जिल्हयाचे पोलीस अधीक्षक डॉ. श्री. महेश्वर रेडड्ी यांनी सदर घटनेची दखल घेत परमेश्वर नागरगोजे यांना पोलीस अधीक्षक कार्यालयात बोलावुन त्यांना प्रशंसापत्र, पुष्पगुच्छ आणि ५,०००/—रू बक्षिस देवुन त्यांचे कार्याचे कौतुक केले.

---

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
✍: 7276494810 (PRO)

# वारंवार चोऱ्या करणारा आरोपी रामनगर पोलीसांच्या जाळयात

पोलीस स्टेशन रामनगर हद्दीतील संजय गांधी मार्केट, बस स्टॉप, रेल्वे स्टेशन परिसरात काही दिवसांपासुन वांरवार चोरी होत होती आणि चोरीचा उलगडा लावण्यासाठी रामनगर येथील गुन्हे शोध पथक सतत प्रयत्नात होते. दिनांक १९/०५/२०२० रोजी सुध्दा एका आरोपीने रेल्वे स्टेशन परिसरात तीन पानटपरी फोडल्याबाबत रामनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयांचा उलगडा लावणे आणि आरोपीस निष्पन्न करण्याचा प्रयत्न रामनगर पोलीसांनी सतत सुरूच ठेवला. गुन्हे शोध पथकाने आपली तपास कौशल्य वापरून गोपनीय माहिती, तांत्रीक विश्लेषण आणि सिसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातुन एका संशयीत इसमाचा शोध लावला. आणि सदर इसमास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने कबुली दिली की, त्याने दिनांक १९/०५/२०२० रोजी आणि त्यापुर्वी सुध्दा चोरी केली आहे. यावरून आरोपी नामे मंगेश देवीदास कुमरे रा. जांभुळधरा, कोरपना वय २५ वर्ष यास अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीकडुन एकुण चार मोबाईल फोन, सिगारेट पॅकेट, पॉवरबॅक आणि रोख रक्कम ६,३००/—रू असा एकुण २४,०२०/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याव्यतीरिक्त आरोपीकडुन अप.क्र. ४९३/२०२०, ३१४/२०२०, ११९/२०२० असे एकुण तिन गुन्हे उघडकीस आले आहे. सदर आरोपी हा वांरवार चोरी करण्याचा आदी असुन तो पागल असल्याचे नाटक करतो. आणि यापुर्वी पोलीस स्टेशन रामनगर येथील तिन गुन्हयात त्यास ५ वर्ष शिक्षा झाली आहे. सदर गुन्हयाचा पुढिल तपास रामनगर पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक चंद्रपुर डॉ. श्री. महेश्वर रेड्डी आणि अपर पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत खैरे यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपुर श्री. शिलवंत नांदेडकर यांचे नेतृत्वात पोनि. श्री. हाके, पोलीस स्टेशन रामनगर, यांचे सह पोउपनि. संदीप कापडे, सफौ. माहुलीकर, पोहवा. कामडी, रजनिकांत पुठ्ठावार, आनंद परचाके, शंकर येरमे, पुरूषोत्तम चिकाटे, निलेश मुळे, माजीद पठाण, विकास जुमनाके, भावना रामटेके यांनी पार पाडली.

———————————————————————————————————